## कृषिमंत्री श्री. दादा भुसे यांचे गौरवोद्गार

# बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्राचे कार्य प्रशंसनीय

जैविक संसाधनांच्या भांडवलावर रोजगाराची सुवर्णसंधी देणारा; तसेच पीकवृद्धीला मोलाचा हातभार लावणारा 'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण' प्रकल्प प्रशंसनीय आहे, असा अभिप्राय राज्याचे कृषिमंत्री श्री. दादा भुसे यांनी व्यक्त केला. गेल्या महिन्यात दि. २१ फेब्रुवारी रोजी दिलेल्या सदिच्छा भेटीत ते बोलत होते. यावेळी 'पूर्वा केमटेक प्रा.लि.' आणि 'ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांनी 'बसवंत गार्डन' संकुलातील विविध उपक्रमांची सविस्तर माहिती ना.श्री. भुसे यांना दिली. 'पूर्वा कृषिदूत' मासिकाचे संस्थापक संपादक आणि ज्येष्ठ कृषिवैज्ञानिक डॉ. बी.बी. तथा श्री. अण्णासाहेब पवार यांनी मंत्रिमहोदयांचे कार्यस्थळी स्वागत केले.

नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत (ता. निफाड) येथील मुखेड रोडवरील 'बसवंत गार्डन' परिसरातला हा वेधक 'मधु-उद्योग प्रशिक्षण प्रकल्प' आता देशभरातल्या मधुमक्षिका पालकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरतो आहे. एकूणच लहानथोर अशा सर्वच समाज घटकांसह शालेय- महाविद्यालयीन विद्यार्थिवर्गातही यांविषयी औत्सुक्य आहे. यापूर्वी नागरिकांनी व विद्यार्थ्यांसह शिक्षक तसेच पालकांनी देखील येथे कृषिपर्यटनाचा आनंददायी अनुभव घेतलेला आहे. या पार्श्वभूमीवर, मधमाशी पालनासारख्या पर्यावरणस्नेही उद्योगांना शासकीय पातळीवरून सर्वतोपरी साह्य मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे आश्वासन ना. भुसे यांनी याप्रसंगी उत्स्फूर्तपणे दिले, ही विशेष नमूद करण्यासारखी बाब होय.





राज्याचे कृषिमंत्री श्री. दादा भुसे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना 'पूर्वा कृषिदूत' मासिकाचे संस्थापक संपादक डॉ. बी.बी. तथा श्री. अण्णासाहेब पवार. समवेत माजी आमदार अनिल कदम आणि इतर मान्यवर. शेजारच्या छायाचित्रात 'बसवंत गार्डन' संकुलातील विविध प्रकल्पांची माहिती देताना 'ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.' तसेच 'पूर्वा केमटेक प्रा.लि.'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार.

या परिसरातील अद्ययावत मधुमक्षिका पालन व प्रशिक्षण केंद्र, आदर्श गाव सेवरगांव, फळ प्रक्रिया प्रकल्प व अन्य उपक्रमांची ना. भुसे यांनी आस्थेवाईकपणे चौकशी केली. एक खासगी आस्थापना असे निसर्गानुकूल आणि समाजोपयोगी कार्य हाती घेते; यथाशक्ती प्रबोधन करून प्रत्यक्ष कृतिशीलताही बाळगते ही बाब कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले.

या कार्यक्रमात माजी आमदार श्री. अनिल कदम, नाशिक जि.प. अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते भास्करराव बनकर, संपर्कप्रमुख भाऊसाहेब चौधरी, श्री. शिवा सुरासे, विभागीय कृषी संचालक संजय पडवळ, उपविभागीय कृषी अधिकारी गोकुळ वाघ, कृषी विकास अधिकारी रमेश शिंदे, कृषी सहायक ज्योती पाचारणे, जिल्हा माहिती सहायक किरण डोळस आदी मान्यवर सहभागी होते. त्याचप्रमाणे 'पूर्वा केमटेक'चे महाव्यवस्थापक सुनील पाटील, कंपनीच्या खान्देश विभागाचे संचालक महेश पाटील, 'बसवंत गार्डन' संकुलाचे प्रकल्प संचालक श्री. संदीप वाघ, उत्पादन व्यवस्थापक श्री. रवी अहिरे, मधमाशी उद्यान केंद्राचे प्रकल्प व्यवस्थापक श्री. नितीन कराळे यांसह 'पूर्वा-ग्रीनझोन' परिवारातील अनेक सहकारीही कार्यक्रमाला उपस्थित होते.



'ॲक्टिव्ह मोड'वरच्या मधमाशीचा 'स्टॅच्यू' आहे पाठीशी; आमचं नातं कृषिस्नेही उद्यमशीलतेशी.



निसर्गातली साधनसामग्री 'सेव्ह' करून प्रगती साधण्याचा संदेश देणारं स्वयंपूर्ण 'सेवरगांव'.



मधमाशी प्रशिक्षण केंद्रातल्या मधुपेट्यांमध्ये नांदणाऱ्या सजीव समृद्धीचं अवलोकन.



मा. मंत्रिमहोदयांच्या समवेत सुरू असलेली 'ग्रीन कॉरिडॉर'मधली आश्वासक वाटचाल.